पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलिस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो. स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पण या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खूप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस खात्याबद्दलची माहिती वाचायला मिळते तसेच पोलिसांनी केलेली काम याची माहिती दर्पण या पुस्तकातून अतिशय समर्पक रित्या सांगितलेली आहे.

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असून ती अतिशय महत्वाची आहे.

दिनांक 24/08/2019

स्वाक्षरी PC 8814

---

प्रति,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
विश्रांतवाडी पो. स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम. डी. [illegible] स.पो. उप.निरीक्षक.
विश्रांतवाडी पो. स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तकाचे अभिप्राय बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करतो की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी त्यांचे संकल्पनेतून तयार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तिकेचे आम्ही सर्वांनी वाचन केले आहे. त्यामुळे आम्हाला पोलिसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत माहिती मिळून त्याप्रमाणे कार्य करण्यास आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही सदरचा [illegible] पोलिस ठाण्यातील 'दर्पण' पुस्तिका ही ठेवण्यात येऊन पो.स्टे येथे येणाऱ्या अर्जदार व नागरिकांना वाचण्यास देऊन सदर पुस्तकामुळे नागरिकांच्या मनात पोलिसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

स. पोलीस उप. निरीक्षक
वि.वाडी पो.स्टे पुणे.

# पोलिसांमधील माणूस

पोलिसांमधील माणूस

## ६ क्रेडिट कार्डचे पाकीट : औषधाच्या पावतीवरून घेतला शोध

# दामिनींनी केले पाकीट परत

लोकमत न्यूज नेटवर्क



६ क्रेडिट कार्ड, ३ डेबिट कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र अशी महत्वाची कागदपत्रे असलेले पाकीट परत करताना दामिनी पथक.

**पुणे :** शिवाजीनगर एसटी बसस्थानकावर त्या गस्त घालत असताना, त्या दोघा दामिनींना एक पैशाचे पाकीट सापडले.

पाकिटात पैसे नव्हते; मात्र त्याही पेक्षा ६ क्रेडिट कार्ड, ३ डेबिट कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र अशी महत्वाची कागदपत्रे होती. पाकिटातील महत्वाची कार्ड पाहून ती संबंधितापर्यंत पोहोचवायची कशी, याचा विचार करीत असतानाच त्या पाकिटात एका डॉक्टरांची औषधाच्या पावती होती. त्यावरुन त्यांनी पाकिटाच्या मालकाशी संपर्क साधून त्यांना पाकीट परत केले.

सचिन रमेश टोपे (वय २९, रा. हिंजवडी) यांचे ते पाकीट होते. सचिन टोपे हे ३ ऑगस्ट रोजी तुळजापूरला जाण्यासाठी शिवाजीनगर बसस्थानकात आले होते. त्या वेळी त्यांचे पाकीट मारले होते.

पाकिटात केवळ ५० रुपये होते; मात्र त्यात ९ डेबिट व क्रेडिटकार्ड, पॅनकार्ड व आधार कार्ड, मतदान ओळखपत्र अशी महत्वाची कार्ड होती. त्यांच्या कार्डाची किंमत तब्बल ५ लाख रुपये होती. त्यामुळे आपल्या कार्डांचा कोणी दुरुपयोग करणार नाही ना, याची त्यांना काळजी होती.

डॉक्टरांनीही सचिन यांना फोन करून पाकीट सापडल्याची माहिती दिली.

पाकिटाविषयी खात्री पटल्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोपनर यांच्या हस्ते सचिन टोपे यांना पाकीट परत करण्यात आले.

◆ शिवाजीनगर दामिनी पथकातील श्वेता वलेकर व वैष्णवी दुरगुडे या ४ ऑगस्टला सकाळी गस्त घालत असताना त्यांना पाकीट सापडले. त्यांनी त्याची पाहणी केल्यावर त्यात महत्वाची कार्ड असल्याचे त्यांच्या लक्षात आले. पाकीटमाराने पैसे काढून ते फेकून दिले असावे, असे त्यांना वाटले. त्यांनी त्यातील डॉक्टरांच्या चिठ्ठीवरुन सचिन टोपे यांच्याशी संपर्क साधला.

लोकमत – दि. २० ऑगस्ट, २०१९

# पुणे पोलिसांतर्फे पूरग्रस्तांना दहा लाख रुपयांची मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात नदीला आलेल्या पुरामुळे हजारो नागरिकांवर बेघर झाले आहेत. अन्न, वस्त्र आणि निवारा या तिन्ही मुलभूत गोष्टींपासून त्यांना वंचित राहावे लागत आहे. समाजातील वेगवेगळ्या स्तरांतून त्यांच्याकरिता मदतीचा हात पुढे येत असून त्यात पुणे शहर पोलिसांनी पुढाकार घेत दहा लाख रुपयांचे जीवनावश्यक साहित्याची मदत पूरपीडितांना पाठविली आहे. विविध क्षेत्रांकडून पूरग्रस्तांना मदत मिळत असताना पोलीसही सरसावले आहेत.

सांगली शहर आणि जिल्ह्यातील विविध गावांमधील घरांमध्ये पाणी घुसल्याने पूरग्रस्तांना तांदूळ, दूध पावडर, बिस्किटे, फरसाण, फुटाणे, डाळी, मीठ आणि मेणबत्ती आदी ६ लाख रुपयांच्या जीवनावश्यक वस्तूंचा टेम्पो चार दिवसापूर्वी सांगली पोलीस अधीक्षक कार्यालय येथे रवाना करण्यात आला. त्यानंतर मंगळवारी चार लाख रुपयांचे जीवनपयोगी साहित्य घेऊन जाणारी वाहने कोल्हापूर पोलीस अधिक्षक कार्यालय येथे पाठविण्यात येणार आहे.

संबंधित जिल्ह्यातील स्थानिक पोलीस अधिकारी नागरिकांना साहित्य वितरणाची जबाबदारी घेणार आहेत अशी माहिती विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त मितेश घट्टे यांनी दिली.

# कात्रजमध्ये नऊ दुचाकी जप्त

## चार आरोपींना पोलिसांकडून अटक

म. टा. प्रतिनिधी, कात्रज

गस्त घालत असताना संशयितरीत्या फिरणाऱ्या दोन तरुणांकडे पोलिसांनी चौकशी केली असता ते अट्टल वाहनचोर निघाले. भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक सुबराव लाड आणि त्यांच्या पथकाने चोरांना ताब्यात घेतले असून, नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

शंभू राजेंद्र खवळे (वय २०) आणि नीलेश मिटू कदम (वय १९, दोघे सध्या रा. थेऊर, मूळ रा. बीड), भानुदास तुकाराम धोत्रे (वय ४०, रा. खंडाळा) आणि सुनील रमेश जाधव (रा. वाजेघर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पथक कात्रज परिसरात गस्त घालत होते. या वेळी खवळे आणि कदम हे संशयित आरोपी परिसरात फिरत असताना दिसले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिले. पोलिसांना संशय आल्याने त्यांनी सखोल चौकशी केली असता यांच्यावर गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली. त्यांना पोलिसी हिसका दाखवताच आरोपींनी मौजमजेसाठी जिल्ह्यातील लोणी काळभोर आणि यवत पोलिस ठाण्यांच्या हद्दीतून आठ दुचाकी चोरल्याची कबुली दिली. तसेच दुसऱ्या प्रकरणात भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात पूर्वीपासूनच गुन्हा दाखल असलेला आरोपी धोत्रे आणि जाधव यांच्याकडून एक दुचाकी जप्त करण्यात आली. भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विष्णू पवार, निरीक्षक विष्णू ताम्हाणे, सुबराव लाड, कर्मचारी कृष्णा बढे, गणेश चिंचकर, अभिजित जाधव, अभिजित रत्नपारखी, महेश मंडलिक, कुंदन शिंदे, सारफराज देशमुख, राहुल तांबे, सचिन पवार, योगेश सूळ यांनी कारवाईमध्ये सहभाग घेतला.

बजरंग निंबाळकर



जप्त केलेल्या दुचीकींसह पोलिसांचे पथक.

# पोलिसांमुळे वाचले तरुणाचे प्राण

## येरवडा पोलिसांची कामगिरी

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

पोलिस हे कधीच वेळेवर पोहोचत नाहीत. एखादा गुन्हा किंवा घटना घडल्यानंतर ते दाखल होतात, अशी नेहमीच चर्चा केली जाते. मात्र, येरवडा येथे कौटुंबिक वादातून गळफास घेणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी वेळीच घटनास्थळी धाव घेऊन रुग्णालयात दाखल केल्याने त्याचे प्राण वाचले आहेत. येरवडा येथील गांधीनगर येथे ही घटना घडली. पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेचे नागरिकांमधून कौतुक होत आहे.

परमेश्वर सगट असे प्राण वाचविलेल्या तरुणाचे नाव आहे. सगट हा गांधीनगरमध्ये पत्नी मनीषा सोबत राहतो. तो पत्नीला कौटुंबिक वादातून शिवीगाळ करून मारहाण करीत असे. त्यामुळे पत्नीने १९ ऑगस्ट रोजी पर्णकुटी चौकीत पतीविरोधात तक्रार दिली होती. त्यावरून पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करून पतीला नोटीस दिली होती. तसेच त्याचे समुपदेशन करून केले. मात्र, घरी गेल्यावर दुपारी पुन्हा दोघांचे भांडण झाले. परमेश्वरने मनीषाला घरातून बाहेर काढून आतून दाराची कडी लावली. त्यानंतर दोरीने छताला गळफास घेतला. पत्नीने खिडकीतून हा प्रकार पाहिला आणि पर्णकुटी चौकीत धाव घेतली. पती गळफास घेत असल्याचे सांगितले. उपनिरीक्षक भूषण कोते यांनी तत्काळ बीट मार्शल तेजस भोसले आणि कपिल भाकरे यांनी घटनास्थळी पाठवले. त्यांनी खिडकीतून पाहिले असता परमेश्वर हा लटकलेला दिसून आला. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता घराचे दार तोडून आत प्रवेश केला आणि परमेश्वरला खाली उतरविले. त्याचा श्वासोच्छवास सुरू असल्याने तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. वेळीच उपचार मिळाल्याने तरुणाचे प्राण वाचले.

# आत्महत्या करण्यापासून महिलेला पोलिसांनी रोखले

**पुणे** - दत्तवाडी पोलीस ठाण्यात एक व्यक्तीने कॉल करून पत्नी आत्महत्या करण्यास गेली असून तिला वाचवा अशी विनंती



केली होती. पोलिसांनी तत्परतेने हालचाली करत संबंधित महिलेस खडकवासला परिसरात गाठले. तिला आत्महत्या न करण्याचा सल्ला देत समुपदेशन करण्यात आले. याप्रकारे तिला आत्महत्येसाठी परावृत्त करण्यात आले. ती महिला खडकवासला धरणावर जीव द्यायला जात असल्याचे समजले. यामुळे तिच्या मागावर पोलीस खडकवासला धरणापर्यंत पोहोचले आणि त्या महिलेला जीव देण्यापासून परावृत्त केले. तिला समुपदेशन करून जीव देण्याच्या विचारापासून परावृत्त केले. अशा तऱ्हेने दोन तास सलग पाठपुरावा करून जीव देण्यास निघालेल्या महिलेचा शोध घेऊन तिला वाचविण्यात आले. स्वतःची बायको सुखरूप मिळाल्याने नवऱ्याचा जीव भांड्यात पडला व त्याने पोलीस कॉन्स्टेबल जयाजी श्रीमंगले व अमोल झणझणे यांचे आभार मानले अन् त्या वेळेस त्याच्या डोळ्यात पाणी आले अशा तऱ्हेने घटनाक्रमाचा शेवट सुखद झाला.

**पुण्यनगरी** – दि. २५ ऑगस्ट, २०१९

# दामिनी पथकाच्या पोलीस कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा

▮ पुणे : प्रतिनिधी

पीएमटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाचा पडलेला मोबाईल दामिनी पथकाच्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी सदर इसमास परत केला. त्यामुळे महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे पोलीस दलात कौतुक होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दामिनी पथकाच्या पोलीस शिपाई स्वाती रणसिंग व पोलीस नाईक जयश्री भालेराव या स्वारगेट येथील रस्त्याने जात असताना त्यांना रस्त्याच्या कडेला मोबाईल पडलेला दिसला. त्यांनी तो मोबाईल घेतला व स्वारगेट पोलीस ठाण्यात जाऊन दिला. तेथे पहाणी करत असताना मोबाईलच्या कव्हरमध्ये २ हजार आणि २ रुपयाची नोट आढळून आली. त्याच वेळी मोबाईलवर फोन आला. फोनवरील व्यक्तीने नरसिंह प्रल्हाद नागमंत्री (वय २४, रा. अवलकोंडा, ता. उदगीर, जि. लातूर) नाव असल्याचे सांगितले. मोबाईलच्या कव्हरमध्ये नोटा असल्याचे सांगितले. पीएमटी बसने कोंढव्याला जात असताना मोबाईल खाली पडला होता. उद्या येऊन मोबाईल घेतो असे सांगितले. दुसऱ्या दिवशी खात्री पटल्यानंतर नागमंत्री याला त्याचा हरवलेला दहा हजार रुपये किमंतीचा मोबाईल परत करण्यात आला. नागमंत्री हा बिगारी काम करीत आहे.

**लोकमत** – दि. १४ ऑगस्ट, २०१९



पोलिसांनी ऐवज संबंधित महिलेच्या घरी जाऊन सुपूर्त केला.

# ज्येष्ठ नागरिक महिलेच्या घरी जाऊन सुपूर्त केले दागिने

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : केअर टेकरने ज्येष्ठ नागरिकांच्या असायतेचा फायदा घेत त्यांच्या कपाटातील १३ तोळे साने आणि रोकड लंपास केली होती. याप्रकरणी दत्तवाडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी आपली चक्रे हलवत काही तासांमध्ये आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरलेले दागिने जप्त केले. त्यांनतर सर्व प्रक्रिया पूर्ण करुन पोलिसांनी ज्येष्ठ महिलेच्या घरी जात त्यांना ते दागिने सुपूर्त केले.

मुग्धा मधुकर साळवी या ७० वर्षाच्या ज्येष्ठ महिलेने दत्तवाडी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. साळवी यांचे पती सतत आजारी असल्यामुळे त्यांच्या देखभालासाठी साळवी यांनी एका खासगी नर्सिंग ब्युरोमधून एका केअरटेकरची नेमणूक केली होती. त्या केअरटेकरने ज्येष्ठ नागरिक महिलेच्या असहायतेचा फायदा घेत त्यांच्या घरातील कपाटातील १३ तोळे सोने आणि रोकड लंपास केली. ज्येष्ठ नागरिक महिलेच्या घरी चोरी झाल्याने पोलिसांनी अत्यंत वेगाने तपासाची चक्र हलवून आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याकडून मुद्देमाल जप्त केला. याप्रसंगी सहायक पोलीस निरीक्षक शंकर सलगर, पोलीस उपनिरीक्षक मंगेश साळवे, कुलदीप संकपाळ, सहायक पोलीस उपनिरीक्षक मारुती चव्हाण, पोलीस हवालदार श्रीकांत शिरोळे, तानाजी निकम, सुधीर घोटकुले, महेश गाढवे, प्रमोद भोसले, विशाल साळुंखे उपस्थित होते.

पुढारी – दि. १०ऑगस्ट, २०१९

# मुलाने सोडले, पोलिसांनी सांभाळले!

**पुणे : प्रतिनिधी**

कुटुंबाने वाऱ्यावर सोडलेल्या वयस्कर महिलेचा दत्तवाडी पोलिसांनी तीन दिवस आईसारखा सांभाळ करून एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. दिवसेंदिवस आधुनिक विश्वात रमणाऱ्या लोकांमध्ये नात्याचा ओलावा कमी होत असतानाच पोलिसांनी मात्र माणुसकीची नाती जपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

तीन दिवसांपूर्वी दांडेकर पुलाजवळ स्वतःच्या घरचा पत्ता विसरल्यामुळे सोनाबाई भोसले या ६५ वर्षांच्या महिला एकट्याच भटकत होत्या. स्थानिक नागरिकांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांना काही सांगता येत नसल्यामुळे दत्तवाडी पोलिस ठाण्यात आणून सोडले. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडे विचारणा केली तेव्हा त्यांना



**मुलीच्या ताब्यात आईला सुखरूप देताना दत्तवाडी पोलिस ठाण्याचे कर्मचारी**

आपल्या घराचा पत्ता सांगता आला नाही.

काही वेळाने त्यांच्याकडून मुलाचा फोन नंबर मिळवला. त्या नंबरवर फोन केला असता तो फोन त्यांच्या सुनेने उचलला. त्यावेळी तिने सासू त्यांच्यासोबत नाही तर वारजे भागात राहत असल्याचे सांगून फोन कट केला. एवढेच नाही तर फोन बंददेखील करून टाकला. त्या दिवशी शहरात जोरदार पाऊस असल्यामुळे पोलिसांनी वृद्ध महिलेला येथून बाहेर न जाऊ देण्याचा निर्णय घेतला.

यानंतर महिलेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी त्यांची मुलगी भोर येथे राहत असल्याचे संगितले. मात्र, याविषयी त्यांनाही अधिक आठवत नव्हते. केवळ त्यांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार पोलिसांनी त्यांच्या मुलीचा पत्ता शोधून काढला. परंतु, दुर्दैवाने या ठिकाणीदेखील जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे प्रवासाचा रस्ता बंद होता.

एकंदर दोन्ही ठिकाणच्या परिस्थितीचा विचार करून पोलिसांनी आजीबाईंना पोलिस ठाण्यात सांभाळण्याचा निर्णय घेतला.

त्यांच्यासाठी पोलिस कर्मचारी नित्यनेमाने घरून जेवणाचा डब्बा आणत होते. त्यानंतर शुक्रवारी पाऊस कमी झाल्यावर पोलिस उपनिरीक्षक मंगेश साळवी, पोलिस कॉन्स्टेबल सागर नारगे, प्रज्ञा खोपडे, संध्या काकडे यांनी संबंधित महिलेला मुलगी शैला व जावई मिहान यादव यांच्याकडे खासगी वाहनाने पोहोचवले.

याबाबत वरिष्ठ निरीक्षक देविदास घेवारे म्हणाले की, वृद्ध महिलेला कोणी नातेवाईक नाही म्हणून शासनाच्या वतीने वृद्धाश्रमात ठेवता आले असते. मात्र, तीसुद्धा आई आहे आणि आपल्या आईप्रमाणे तिलासुद्धा भावना आहेत. तिला तिच्या मायेच्या इतर माणसांपर्यंत पोहचवले पाहिजे, असा विचार करून तिच्या मुलीचा पत्ता शोधून घरी सोडण्याचा निर्णय घेतला.

पोलिसांच्या या कृतीबद्दल या परिसरात त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

**प्रभात** – दि.३१ ऑगस्ट, २०१९

# सोशल मीडियामुळे सापडला हरवलेला मुलगा



सिंहगड रोड, दि. ३० - कर्नाटकमधून गणपती पाहाण्यास आलेल्या अरुण कुमार चव्हाण नावाचा मुलगा हरवला होता. नातेवाईकांनी तत्काळ वडगाव पोलीस स्टेशनमध्ये संपर्क केला. त्यानंतर पोलिसांनी सोशल मीडिया वरून फोटो टाकून शोध घेण्यात आला. पोलिसांना साडे चार तासानंतर या मुलाला शोधण्यात यश आले. त्यानंतर त्या मुलाला आई-वडिलांकडे अरुणच्या आई-वडिलांनी पोलिसांचे आभार मानले.

**सामना** – दि. ०२ ऑगस्ट, २०१९

# अपघातात जखमी महिलेला दामिनी पथकाची मदत

पुणे, दि. २ (प्रतिनिधी) - दुचाकी अपघातात जखमी झालेल्या महिलेला दामिनी पथकातील मार्शलनी तत्काळ दवाखान्यात दाखल केले. महिलेवर उपचार करून तिला घरच्यांच्या ताब्यात देण्यात आले.

लक्ष्मी पाटोळे असे अपघातात जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. दत्तवाडी परिसरातील लक्ष्मीनगर सारंग सोसायटीच्या समोर शुक्रवारी सकाळी साडेबाराच्या दरम्यान हा अपघात झाला. पाटोळे यांनी रस्त्यावर गाडी थांबवली होती. यावेळी समोरून आलेल्या दुचाकीस्वाराचे चाक त्यांच्या पायावरून गेले. यावेळी उपस्थित नागरिकांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली. मात्र, दामिनी पथकातील श्वेता कदम आणि स्वाती डुकरे या कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत त्यांना रुग्णालयात दाखल केले. उपचारानंतर घरच्या लोकांच्या ताब्यात देण्यात आले.

सकाळ – दि. ०८ सप्टेंबर, २०१९

# हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत

## उत्तमनगर, वारजे माळवाडी पोलिस, नागरिकांची सतर्कता

राजेंद्रकृष्ण कापसे

खडकवासला, ता. ७ : खडकवासला धरणालगतच्या पुलावर मंगळवारी दुपारी एक मुलगी (वय साडेचार) रडताना पोलिसांना आढळली; तर दुसऱ्या घटनेत कर्वेनगर परिसरात मध्यरात्री दीड वर्षाचा मुलगा मंदिराजवळ नागरिकांना आढळला. पोलिस, नागरिकांच्या सतर्कतेमुळे ही मुले अवघ्या दोन-तीन तासांत त्यांच्या आईच्या कुशीत विसावली.



उत्तमनगर : आईला पाहताच तिच्याकडे झेपावलेली वीरा.

दुपारी दीड दोनच्या सुमारास धरणालगतच्या पुलावर उत्तमनगर ठाण्याचे फौजदार अभिजित दैरे बंदोबस्तासाठी होते. धरणातून सोडलेल्या पाण्याची छायाचित्रे नागरिक काढत होते. तेव्हा दैरे यांना एक मुलगी रडताना दिसली. तिच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी दैरे हे अर्धा एक किलोमीटर चालत गेले; परंतु नातेवाईक सापडले नाहीत. ते पुन्हा पुलावर परतले. उत्तमनगर ठाण्यात मुलीने प्रश्नांची उत्तरे दिली. दरम्यान, तिची आत्याही भाची हरविल्याची तक्रार देण्यासाठी एनडीए चौकीत आली होती. नंतर उत्तमनगर ठाण्यात मुलीची आईही पोचली. तिला पाहून वीरा आईकडे झेपावली.

## माणुसकी जपणाऱ्या युवकाचे कौतुक

कर्वेनगर : दीड वर्षाच्या मुलाला कर्वेनगर परिसरात वडील सोडून गेल्याची घटना घडली. परंतु एका युवकाने भरपावसात रडणाऱ्या त्या मुलाला कर्वेनगर पोलिस चौकीत नेले. तपासात तो मुलगा रहाटणीतील असल्याचे समजले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने मुलगा अखेर आईच्या कुशीत विसावला.

पोलिस निरीक्षक प्रकाश खांडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रणित सूर्यवंशी (वय २४ रा. थोरात कॉलनी, कर्वेनगर) रात्री दोन वाजता महालक्ष्मी मंदिराजवळून जात होता, तेव्हा मंदिराच्या पायरीवर चंद्रशेखर साधुचरण पुष्टी (वय दीड, रा. साईज्योत कॉलनी, रहाटणी) हा आढळला. त्याला घेऊन प्रणित कर्वेनगर चौकीत गेला. बीट मार्शल अमोल पायगुडे, बाबासो नरळे, भास्कर खोत, भावेश सोडमीसे यांनी नागरिक विभीषण मुंडे यांच्या मदतीने परिसरातील घरे पिंजून काढली. पण मुलगा कोणाचा याचा तपास लागला नाही. रहाटणीतील मुलगा हरविल्याची तक्रार महिलेने दिल्याचे कंट्रोलमार्फत समजले.



वाकड पोलिस चौकी : आईच्या कुशीत विसावलेला चंद्रशेखर पुष्टी.

# अभिप्राय...

मा. वरिष्ठ पो. निरीक्षक सो
कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे.
यांना सविनय सादर

रिपोर्ट - श्री. एम. पाडवी पोलीस उपनिरीक्षक, कोंढवा पोस्टे यांजकडून.

विषय - दर्पण पुस्तकाबाबत.

दर्पण हा उपक्रम सुरु झाल्यापासून पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बद्दल लोकांना माहिती मिळते. या उपक्रमामुळे पोलीस व जनता यांच्यातील संबंध अधिक सुधारण्यास मदत होत आहे. जनतेचा व सामान्य लोकांचा पोलीसांवरचा विश्वास अधिकच बळकट होत आहे. मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी सुरु केलेला दर्पण हा उपक्रम यशस्वी असून तो पोलीसांसाठी व जनतेसाठी उपयुक्त असून मोलाचे मार्गदर्शन असा ठरला आहे.

मा. सादर असे
दि. 18/05/19.
[signature]
पोलीस उपनिरीक्षक
कोंढवा पो.स्टे. पुणे शहर

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५८८३

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-

मानिय महोदय,
दर्पण पुस्तिकेचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या पो. स्टेला दाखल गुन्हे, त्यांची थोडक्यात माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दखल या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत संबंधित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवांना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरीताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

दिनांक :- २९.०५.२०१९

Mahadik LPN 5991.
स्वाक्षरी


Man arrested for estranged girlfriend's murder attempt
Will act against illeg private security firm warns police chief
बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण
बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारू
चालक व मालकांवर कारवाई करणार
अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई
शाखेकडून गुंडांची झाडाझडती
वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक
पाच जणांच्या टोळीला अटक
पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत
धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद
कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर
चार किलो गांजासह आरोपीला अटक
पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास
महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक
पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान
कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष
गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक
पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे
नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक
पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'
चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले ह
सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात
Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore
उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच.
Gang duping people with promise of real American dollars nabbed
हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत
संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार
अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास
सोशल मीडियामु
सापडला हरवलेला
दामिनींनी केले पाकीट परत
एका ढोल ताशा पथकाला
मंडळात सहभागी होता येणा
पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन
सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत
गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक
भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ
विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी
हडपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन
हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसांचे
आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव
गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे
इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद